प्रेसनोट

दि.१३/३/२०१९

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | अहमदनगर/नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | पाथर्डी पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| कलम | ला.प्र.का. सन १९८८ (संशोधन) सन २०१८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | कुनाल किशोर पाटील, पर्यवेक्षक, पाणी पुरवठा व स्वच्छता, नगर परिषद, पाथर्डी, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये २०,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये २०,०००/— |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, साशा हाऊस किपींग अॅन्ड फॅसेलिटीज प्रा.लि. ठाणे या कंपनीने नगर परिषद पाथर्डी येथील शहर स्वच्छतेचे टेंडर घेतलेले असुन यातील तक्रारदार हे सदर कंपनीचे सुपरवायझर म्हणुन काम पाहतात. यातील लोकसेवक कुनाल किशोर पाटील, पर्यवेक्षक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, नगर परिषद पाथर्डी यांनी तक्रारदार (सुपरवायझर) यास शहरातील स्वच्छतेची पहाणी करण्याकरीता टिम येणार असुन त्यांना देण्यासाठी २०,०००/— रुपये दयावे लागतील ते न दिल्यास तुमच्या कंपनीला दंड लावून तुमचे नुकसान करून, कंपनी ब्लॅक लिस्ट मध्ये टाकु, ते सर्व माझ्या रिपोर्टवर अवलंबुन आहे, अशी भिती घातली असता, यातील तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर युनिटशी संपर्क साधुन सदर बाबत तक्रार दिली. सदर तक्रारीची दिनांक १२/३/२०१९ रोजी लाच मागणी पडताळणी करण्यात आली.पडताळणी दरम्यान यातील लोकसेवक पाटील, यांनी तक्रारदार यांना पंचसाक्षीदारा समक्ष २०,०००/— रूपये लाचेची मागणी करून, ती लाचेची रक्कम आज दि.१३/३/२०१९ रोजी सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांचेकडुन पंच साक्षिदारासमक्ष नगर परिषद कार्यालय, पाथर्डी, जि.अहमदनगर कार्यालयात स्वीकारतांना त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :— acbmaharashtra.gov.in

ई—मेल :— acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :— acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :— १०६४

दुरध्वनी क्रमांक :— ०२४१—२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:— ९९३०९९७७००

(किशोर चौधरी)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहमदनगर

Scanned by CamScanner